'भारतातील लोकसंस्कृती आणि मौखिक परंपरेचा विद्यमान वारसा' हे पुस्तक अनेकार्थाने वैशिष्ट्यपूर्ण आहे. लोकसंस्कृती आणि मौखिक परंपरा या दोन संकल्पना केंद्रस्थानी ठेवून विविध ज्ञानशाखांतील अभ्यासकांनी लिहिलेले लेख या पुस्तकात संपादित केले आहेत. त्यातून साहित्य, समाज, संस्कृती आणि इतिहास अशा अनेक विषयांवर प्रकाश पडला आहे. भारतवर्षाच्या पृष्ठभागावर मानवाने विकसित केलेली संस्कृती ही किती बहूविध, बहूस्वरूपी आणि बहुस्तरीय आहे याचा विचार या पुस्तकात आला आहे.या पुस्तकातील लेखांमध्ये अधोरेखित झालेला अभ्यास हा संकल्पनात्मक आणि विश्लेषणात्मक अशा दोन्ही स्वरूपाचा आहे. उदा. लोकसंस्कृती, लोकसाहित्य, लोककला, लोकजीवन, आख्यायिका, मौखिक इतिहास, जलसे, बहुसांस्कृतिकता अशा किती तरी संकल्पना या पुस्तकात आल्या आहेत. या संकल्पनांचे विश्लेषण आणि मानवी जीवनातील त्यांचे स्थान याचाही भावविचारी शोध या पुस्तकात घेतला आहे.आज आपण माहिती तंत्रज्ञानाच्या युगात वावरत आहोत. वास्तव, प्रत्यक्ष अनुभव, प्रयोग आणि पुराव्यांच्या आधारे संशोधन सुरू आहे. असे असले तरी मानवाचा इतिहास आणि साहित्य हे लोकसंस्कृती आणि मौखिक परंपरांनी नटलेले आहे, त्यांनी मानवी मनाचे भरण पोषण केले आहे, हे दुर्लक्षित करता येत नाही. डॉ. सर्जेराव पद्माकर आणि डॉ. हाजी नदाफ या संपादकद्वयांनी लोकसंस्कृती आणि मौखिक परंपरांचे भांडार उपलब्ध करून वाचक आणि अभ्यासकांची सोय केली आहे.

- प्रा. डॉ. गिरीश मोरे.

L. G. Publication, Kolhapur

Existing Inheritance of Folk Culture and Oral Traditions in India

Dr. Sarjerao Padmakar, Dr. Haji Nadaf
Dr. Ranjit Mane

Existing Inheritance of Folk Culture and Oral Traditions in India

भारतातील लोकसंस्कृती आणि मौखिक परंपरेचा विद्यमान वारसा

Editor
- Dr. Sarjerao Padmakar
- Dr. Haji Nadaf
- Dr. Ranjit Mane